पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १६८ /२०२३ दि. १०/१०/२०२३

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** उल्हासनगर वाहतूक उप विभाग हद्दीत दि. ११/१०/२०२३ ते दि. २५/१०/२०२३ या कालावधीत उल्हासनगर कॅम्प नं. २ व ३ मधील नेहरू चौक ते शिरू चौक दरम्यान गजानन मार्केट, पटेल मार्ट ते नेहरू चौक दरम्यान जपानी बाजार व इतर चैनीच्या वस्तूंची मुख्य बाजारपेठ आहे. सदर ठिकाणी **नवरात्रौत्सव व दसरा** सणानिमित्त नागरिकांची खरेदीसाठी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. सदर परिसरत वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) नेहरू चौक कडून शिरू चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नेहरू चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नेहरू चौक कडून देवीभवानी चौक–गोल मैदान–उल्हासनगर नं. १ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पटेल मार्ट कडून नेहरू चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पटेल मार्ट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने पटेल मार्ट कडून हिरा मॅरेज हॉल–मधुबन चौक–गोल मैदान मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) नेहरू चौक कडून पटेल मार्ट कडे जाणाऱ्या दुचाकी वगळून इतर वाहनांना **नेहरू चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नेहरू चौक कडून लिंक रोड येथून उजवे वळण घेवून पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि. ११/१०/२०२३ रोजी दुपारी १५:०० ते दि. २५/१०/२०२३ रोजी रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

प्रत कार्यवाहीसाठी :—
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे.

प्रत :— पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग./प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.